।। बहुजन हिताय । बहुजन सुखाय ।।

४२ वर्षापासून नियमितपणे प्रकाशित होणारे जनसामान्यांच्या प्रश्नांचा ध्यास असणारे एकमेव निर्भिड...

४३

# माणदेश वार्ता

संस्थापक संपादक :
स्व.मारुती शिवाजी सोनवणे (एम.ए.)

स्थापना
६ नोव्हेंबर १९८३

RNI NO.
MAH/MAR/2004/16467

POSTAL REGD.
L2/RNP/PPR/04/2024-2026

FACEBOOK
MANDESH VARTA

सांगोला | जुने वर्ष ४३ वे नवीन वर्ष २३ वे | रविवार दि १० मे २०२६ | पाने ४ | मूल्य १ ₹ | अंक १९ वा


## वाढेगावजवळ राष्ट्रीय महामार्ग १६६ वर स्लिपर कोच ट्रॅव्हल्स पलटी; प्रवासी जखमी



सांगोला : सांगोला तालुक्यातील वाढेगाव हद्दीत राष्ट्रीय महामार्ग १६६ वर स्लिपर कोच ट्रॅव्हल्सचा भीषण अपघात होऊन फिर्यादीसह अनेक प्रवासी जखमी झाल्याची घटना ९ एप्रिल २०२६ रोजी पहाटे चार वाजण्याच्या सुमारास घडली. या प्रकरणी सांगोला पोलिस ठाण्यात अनोळखी चालकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, विशाल वामनराव साबळे (वय ३६, व्यवसाय वकिली, रा. अहमदपूर, जि. लातूर) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, ते पत्नी चंदना साबळे यांच्यासह स्लिपर कोच अशोक ट्रॅव्हल्स मधून प्रवास करत होते. दरम्यान, वाढेगाव हद्दीतील आयवळे वस्ती समोरील राष्ट्रीय महामार्ग १६६ वर वाहनावरील चालकाचे नियंत्रण अचानक सुटल्याने बस रस्ता सोडून डाव्या बाजूच्या चारीत जाऊन पलटी झाली. या अपघातात फिर्यादी विशाल साबळे यांच्या डाव्या पायाला गंभीर दुखापत झाली असून पत्नी चंदना साबळे यांच्या उजव्या हाताला व पायाला दुखापत झाली आहे.

तसेच ट्रॅव्हल्समधील इतर प्रवाशांनाही हात, पाय व कमरेस दुखापती झाल्या आहेत. अपघातात वाहनाचे सुमारे ४ लाख रुपयांचे नुकसान झाल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.

या प्रकरणी स्लिपर कोच अशोक ट्रॅव्हल्सच्या अनोळखी चालकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोहेकाँ/१५२ घोंगडे करीत आहेत.

## चिंचोली तलावाजवळ एसटी बस व पिकअपचा भीषण अपघातात पिकअप चालकाचा मृत्यू तर अनेक प्रवासी जखमी





सांगोला : सांगोला तालुक्यातील चिंचोली तलावाजवळ शुक्रवारी (दि. ९ मे) पहाटे भीषण अपघात झाला. सांगोला-महुद रोडवरील इंगोले यांच्या घराजवळ एसटी बस आणि महिंद्रा पिकअप यांची समोरासमोर धडक होऊन पिकअप चालकाचा मृत्यू झाला, तर काही प्रवासी जखमी झाले आहेत.

याबाबत मिळालेली माहिती अशी की, एसटी बस ही पुण्याकडे जात असताना पहाटे सुमारे ५ वाजण्याच्या सुमारास पिकअप ने भरधाव वेगात येत रोडची परिस्थिती न पाहता बसला जोरदार धडक दिली.

या अपघातात पिकअप चालक पांडुरंग लक्ष्मण गायकवाड (वय २८, रा. कडलास, ता. सांगोला) हे गंभीर जखमी झाले. त्यांना उपचारासाठी हलविण्यात आले मात्र उपचारापूर्वीच त्यांचा मृत्यू झाला.

अपघातात एसटी बसमधील श्रीमती श्रद्धा पोरे, प्रवासी अश्विनी इंगोले यांच्यासह इतर काही प्रवासी किरकोळ जखमी झाले आहेत. तसेच दोन्ही वाहनांचे मिळून अंदाजे १० लाख रुपयांचे नुकसान झाल्याचे सांगण्यात आले.

या प्रकरणी चैतन्य व्हरगर (रा. महीम, ता. सांगोला) यांनी फिर्याद दिली असून सांगोला पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोहेका/१२४२ बनसोडे हे करीत आहेत.

## सांगोला विद्यामंदिरचे दहावी बोर्ड परीक्षेत दैदीप्यमान यश



सांगोला : सांगोला येथील सांगोला विद्यामंदिर प्रशालेचे ४८२ विद्यार्थी दहावीच्या परीक्षेला बसले होते. त्यापैकी ४७९ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून प्रशालेचा निकाल ९९.३७ टक्के लागला आहे.तर प्रशालेतील सिद्धी अमोल उकळे ९९.०० टक्के गुण मिळवत प्रशालेत प्रथम आली आहे. तसेच अर्जून बापूसो सावंत ९८.८० टक्के गुण द्वितीय क्रमांक,जिज्ञासा तानाजी घाडगे ९८.२० टक्के गुण तृतीय क्रमांक मिळविला आहे.


प्रशालेत ९५ टक्के होऊन अधिक गुण मिळवून उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांची संख्या २७ आहे.तर ९० टक्के पेक्षा अधिक गुण मिळवणारे विद्यार्थी ७२ आहेत. विशेष श्रेणीत २१२ विद्यार्थी , प्रथम श्रेणीत १७६ विद्यार्थी, द्वितीय श्रेणीत ७६ विद्यार्थी तर उत्तीर्ण श्रेणीत १५ विद्यार्थी आहेत. गणित विषयात पैकीच्या पैकी मार्क मिळविणारे ७ विद्यार्थी, संस्कृत मध्ये पैकीच्या पैकी मार्क मिळविणारे विद्यार्थी २ विद्यार्थी असे उल्लेखनीय यश प्राप्त झाले आहे.

तसेच विज्ञान व टेक्निकल ९९, इंग्रजी व समाजशास्त्र ९८, मराठी ९६, हिंदी ९५ असे गुण मिळवत विषयानुसार यश संपादन केले. या यशस्वी विद्यार्थ्यांचे सांगोला तालुका शिक्षण प्रसारक मंडळ सांगोला संस्थेचे अध्यक्ष प्रा.प्रबुद्धचंद्र झपके, उपाध्यक्ष ॲड विजयसिंह चव्हाण, सचिव मल्लिकार्जुन घोंगडे, खजिनदार शंकरराव सावंत, ९५ % पेक्षा जास्त गुण मिळविणारे २७, तर ९०% पेक्षा जास्त गुण मिळवणारे ७२ विद्यार्थी सांगोला तालुका शिक्षण प्रसारक मंडळ सांगोला संचलित सांगोला विद्यामंदिर प्रशालेमधील इयत्ता दहावी बोर्ड परीक्षेमध्ये २७ विद्यार्थ्यांनी ९५% पेक्षा जास्त गुण मिळविले व ७२ विद्यार्थ्यांनी ९० % पेक्षा जास्त गुण मिळविले.

यामधील ९५ % पेक्षा जास्त गुण मिळवणाऱ्या २७ विद्यार्थ्यांचा पालकासमवेत संस्थाध्यक्ष प्रा. प्रबुद्धचंद्र झपके सर यांच्या हस्ते व संस्था पदाधिकारी, प्रशासकीय अधिकारी, शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे उपस्थितीत सत्कार करण्यात आला. सहसचिव प्रशुद्धचंद्र झपके , संस्था कार्यकारिणी सदस्य शीलाकाकी झपके,विश्वेश झपके, सर्व संस्था सदस्य, प्राचार्य बिभिषण माने, उपमुख्याध्यापक चारूदत्त जगताप, उपप्राचार्य प्रकाश म्हमाणे, पर्यवेक्षक प्रदीप धुकटे, काकासो नरूटे, उत्तम सरगर शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी अभिनंदन केले व शुभेच्छा दिल्या.

# मुक्त विचार

## विचारधन



मतभेद केवळ मतभेदांसाठीच असू नयेत. तसे ते असले तर त्यांना वैयक्तिक वा पक्षीय हेव्यादाव्याचे स्वरूप येते; आणि त्याने कार्यहानी होते.

-यशवंतराव चव्हाण

## चांगले कर्म करा सत्कर्म करा

आपलं शरीर हे अनेक व्याधींची जननी आहे. या शरीरात नाना प्रकारचे रोग होत असतात. जे रोग शरीराला घातक असतात.  शरीराला रोग का होतात? असा जर कोणी प्रश्न विचारल्यास त्याचं नेमकं उत्तर आपल्याला सापडतं. ते म्हणजे ताणतणाव. आपण नेहमीच ताणतणावात वावरत असतो.

माणूस जन्मल्यापासून मरेपर्यंत माणसाला आयुष्यभर टेन्शन असतं. आता म्हणाल की जन्मत: बरोबर कोणतं टेन्शन असतं बाळाला? होय, जन्मत: बरोबरही टेन्शन असतं. कधी भूक लागली आणि आईनं दूध पाजायला वेळ केला तर त्यामुळं सुद्धा येतं लहान बाळाला मानसिक टेन्शन. काही काही काही मुलं नाजायज पैदा होतात तेव्हा त्याची आई त्याला कचऱ्यात फेकून देते. तेही त्या लहान बाळाला टेन्शन. त्यातच काही काही मुलांना जन्मतःच व्याधी असतात. त्यावेळी त्या लहान बाळालाही इंजेक्शनं टोचली जातात. तेव्हा तेही त्या बाळाचं टेन्शन. अलिकडे तर लहान बाळाला शौचालयाची जागाच राहत नाही हेही बाळाचं टेन्शन नाही का? काही काही लोकं बाळाचा गुप्त धनासाठी बळी देतात. हेही टेन्शन नाही का? कधी बाळाला जन्म दिल्यानंतर आईचा मृत्यू होतो. हेही बाळासाठी टेन्शन नाही का? त्यावेळी बाळ अनाथ होते, हळूहळू बाळ मोठं होतं. त्यावेळी त्याला त्याची आई मरण पावल्यास खंत असते व अगदी लहानपणापासूनच त्याला अनाथाचं जीवन जगावं लागतं. बाप दुसरा विवाह करुन मोकळा होतो. कधीकधी काही मुलांचे तर मायबाप दोघंही मरण पावतात तेव्हा तर त्यांचं जीवन अगदी असह्य असतं.

आज सरकार शाळेच्या माध्यमातून सांगत असतं की ताणतणावरहित रहा. परंतु अशी मुलं कशी ताणतणावरहित राहतील. कोणी कितीही अशा मुलांचं दुःख दूर करण्याचा प्रयत्न केला तरी त्या मुलांचं दुःख कोणीच दूर करू शकत नाही. आपलं दुःख आपल्यालाच दूर करावं लागतं. दुःखाबाबत सांगायचं झाल्यास दुःख येण्याला भाग्याची जोड असते असं म्हातारी माणसं म्हणत होती. कोणी म्हणायचे की पूर्व जन्मात आपण पाप केलं असेल, म्हणून आपल्याला त्याचे भोग म्हणून असे दिवस पहायला मिळाले. परंतु भाग्याला आजचा काळ मानत नसल्यानं ते पूर्वजन्माचं पापपुण्य समजता येत नाही. परंतु एका अर्थानं विचार केल्यास ज्या वेळी माता जन्म दिल्यानंतर बाळाला फेकून देते. हे फेकून देताना ज्या बाळाला ती फेकून देते, त्या बाळाचा कोणता दोष असतो? ह्याला पूर्वजन्माचं पाप म्हणता येऊ शकते. कारण कदाचित मागील जन्मात त्याच आईला तिचा जन्म झाल्यानंतर त्या बाळानं फेकून दिलं असेल हे नाकारता येत नाही.

आजकाल जन्म घेताना काही काही मुलांचा जन्म अशा ठिकाणी होतो की त्या ठिकाणी धड बाळाला पोटभर खायला मिळत नाही. तसेच काही काही बाळाचा जन्म अशा ठिकाणी होतो की ज्याच्या पायाशी सुख लोटांगण घेत असतं. ह्याला काय समजावं? त्याला पूर्व जन्माचं पापपुण्य समजता येत नाही तर काय? अलिकडे कोरोनाच्या काळात हाच अनुभव आला. काही काही काही माणसं धडधाकट असूनही तसेच ती उत्तम प्रकारची काळजी घेऊनही ती कोरोनानं मरण पावली. अन् काही काही माणसं धडधाकट नसूनही व कोणत्याही प्रकारची काळजी न घेऊनही जगत आहेत. यालाही पापपुण्य समजता नाही येऊ शकत काय? हे आपलं पापपुण्यच आहे. परंतु जो मानेल किंवा समजेल. त्याला ते पापपुण्य कळेल.

महत्त्वाचं म्हणजे आपले चांगले कर्म आपल्याला चांगलं फळ देऊ शकतात. तसेच आपले वाईट कर्मच आपल्याला वाईट कर्म प्रदान करतात. कोणी म्हणतात की आपण जे कर्म करतो. त्याचे फळ त्याच जन्मात प्राप्त होत असते. कारण असा जन्म वा पुनर्जन्म कोणीही पाहिलेला नाही. परंतु हे जरी खरं असलं तरी पुनर्जन्म नाही असं म्हणता येत नाही वा मानता येत नाही. पुनर्जन्म असेल व जे पापकर्म वा पुण्यकर्म या जन्मात भोगता आलं नसेल, ते भोगायला दुसरा जन्म नक्कीच मिळत असेल. म्हणून चांगले कर्म करा व चांगले फळ चाखायला दुसरा जन्म घेऊन अवश्य या. कारण आपण जे बीजारोपण करू तेच फळ आपल्याला चाखायला मिळेल. आंब्याच्या झाडाला कधीच संत्री लागणार नाहीत. तसंच कर्माचंही आहे. त्यामुळं वाईट कर्माचं रुपांतरण कधीच चांगल्या कर्मात होणार नाही. वाईट कर्माचं फलित वाईटच निघेल आणि चांगल्या कर्माचं फलित चांगलं. मग कितीही जन्म घेतले तरी कर्माचं फळ कधीच बदलणार नाही आणि हीच सत्य गोष्ट आहे वस्तुस्थितीला धरून आणि ही सत्य बाब कधीच नाकारता येत नाही.

**- अंकुश शिंगाडे, नागपूर**

## नैराश्यातून सहकुटुंब आत्महत्या करणे, प्रेमविवाह केला म्हणून जिवे मारणे, ही विकृती कधी संपणार ?

आजमितीला दररोज वर्तमानपत्रातून, सामाजिक माध्यमातून बहुतांश बातम्या या वैयक्तिक आत्महत्या, कुटुंबातील सदस्यांना जिवे ठार मारून स्वत: आत्महत्या करणे, सर्व कुटुंबाने सामुदायिक आत्महत्या करणे अश्या स्वरुपाच्या वाचायला मिळतात.याबरोबरच मुलाने अथवा मुलीने घरच्यांच्या विरोधात जाऊन प्रेमविवाह केला, आंतरजातीय, आंतरधर्मीय, खालावलेल्या आर्थिक परिस्थिती मधील कुटुंबात केला, घरी न कळवता परस्पर लग्न लावून घेतले, घरच्यांनी पसंद केलेल्या मुलाला अथवा मुलीला लग्नासाठी नकार दिला, यासारख्या कारणांवरून त्या दोघांनाही अथवा त्यातील कोणाला एकाला कुटुंबातील सदस्यांनी संगनमत करुन जिवे मारून टाकणे, अश्या घटना सातत्याने पाहायला मिळतात.

एकमेकांवर प्रेम असलेले परंतु घरातून विवाहाला परवानगी मिळणार नाही हे माहिती असल्या कारणाने आधीच प्रेमी युगुलाने एकत्रित आत्महत्या करून जीवन संपवलेले उदाहरणे पण समाजात मोठ्या प्रमाणावर आहेत.

मुलांना लहानपणापासून आपण चांगलं-वाईट, चूक-बरोबर काय, आयुष्यात निर्णय घेण्याचे महत्त्व, चांगल्या वाईट निर्णयांचे आयुष्यावर होणारे परिणाम याबद्दल सांगत असतोच, त्यांचेवर उत्तम संस्कार देखील करीत असतो. तरीही काही बाबतीत आपल्याच मुलांची मतं आपल्यापेक्षा वेगळी असू शकतात, त्यांचा दृष्टीकोन वेगळा असू शकतो, हे स्वीकारणे आपल्याला इतके जड का जावे? मुलांना त्यांनी घेतलेल्या कोणत्याही निर्णयाच्या बाबतीत, जरी तो आपल्याला पटला नसेल तरी, त्याचे संभाव्य परिणाम, फायदे तोटे लक्षात आणून देणे पालक म्हणून नक्कीच आपली जबाबदारी आहे. पण आपल्या सांगण्याला छेद देऊन पण मुलांना त्यांचा अट्टाहास, मग तो कोणत्याही बाबतीत असो, पूर्णच करायचा असेल तर आपण त्यांना ते व्यक्तिगत स्वातंत्र्य देऊ केलं पाहिजे. त्यांना स्वत:ला त्या गोष्टीचा अनुभव घेऊन पाहू देणे, त्यांना स्वत:ला चांगलं वाईट समजणे, त्यांना बाहेरील जग, व्यवहार कळणे, माणसं ओळखणे हे स्वत: शिकू देणे आवश्यक आहे. यातूनही त्यांचा स्व: मनाने स्व: मताने घेतलेला कोणताही निर्णय चुकला अथवा त्यांना पश्चाताप झाला तरी पालक म्हणून त्यांच्या पाठीशी भक्कम उभे राहणे, त्याला परत पाठिंबा देणे, आपल्या पाल्याला सावरणे आणि पुनश्च नवीन आयुष्य सुरू करायला उमेद देणे हेच आपलं कर्तव्य आहे.

अशी कितीतरी लग्न आहेत जी पालकांच्या, नातेवाईकांच्या पसंतीने, साग्रसंगीत पद्धतीने होऊन सुद्धा अपयशी ठरली आहेत. अशी कितीतरी उदाहरणे आहेत जिथे पालकांच्या चुकीच्या निर्णयामुळे मुलांचं आयुष्य, भविष्य बरबाद झालेलं आहे. त्यामुळे आयुष्यात असा कोणताही मूलमंत्र नाहीये जो अंगिकारला तर सगळं मानाप्रमाणेच आणि सकारात्मक होईल. त्यामुळे इतक्या खालच्या पातळीचा विचार करताना, आपल्याच मुला मुलीचा जीव घेताना पालकांनी कुठेतरी स्वत:ची सद्सद्विवेक बुद्धी शाबूत ठेवणे अपेक्षित आहे.

अनेक तरुण मुला मुलींनी घरातून आपल्या प्रेमविवाहाला मान्यता मिळणार नाही या भीतीने स्वत:चे आयुष्य संपवलेले आहे. पालकांविषयी इतकी दहशत, इतकी भीती मुलांच्या मनात असणे रास्त आहे का? आपल्या मुलांना रागवण्याचा, ओरडण्याचा, थोडाफार धाक दाखविण्याचा पालकांना हक्क आहे. पण 'मुलांनी आपल्या भीतीने आत्महत्या करावी' यासारखे दुर्दैव पालकांचे काय असू शकते. जर आपत्य आणि पालक यांच्या मध्ये विश्वासाचा इतका आभाव, संवादात इतकी दरी आणि इतकी वैचारिक भिन्नता असेल तर आपणच पालक म्हणून कुठेतरी कमी पडतोय का, यावर विचार होणे आवश्यक आहे.

एकीकडे आपण जागतिक मैत्री, जागतिक स्तरावर व्यवहार, परदेशात नोकऱ्या, उद्योग, व्यवसाय, आंतरराष्ट्रीय सलोखा, शांतता, सर्वधर्म समभाव या विषयांचा पुरस्कार करीत असताना, 'हे विश्वची माझे घर' या उक्ती नुसार 'माणुसकी ही एकच जात आणि तोच एक धर्म' ही विचार प्रणाली अंगीकारत असताना आपल्याच समाजात राजरोसपणे घडत असलेल्या अश्या घटना पाहिल्या की खरंच मन विषण्ण होते. ज्या मुलांना आपण, प्रतिकूल परिस्थिती मध्ये देखील लहानाचे मोठे करतो त्यांना शिक्षण, उत्तम दर्जाचे आयुष्य, रहाणीमान देण्याचा प्रयत्न करतो, ज्या पाल्याला आपण फुलांसारखे जपतो, त्याचा आपल्याच हाताने जीव घेताना कुठेही जराही या कुकर्माची भीती जन्मदात्या आई वडिलांना, भावांना, इतर नातेवाईकांना वाटत नाही का?

या जगात कोणालाच स्वत:च्या मनाप्रमाणे, इच्छेप्रमाणे, शंभर टक्के स्वप्नवत जीवन जगता येत नसते. प्रत्येकाच्या आयुष्यात चांगल्या वाईट दोन्ही बाजू असतात. आयुष्य म्हंटलं की अडथळे, आव्हाने, अघटित अनपेक्षित घटना या आल्याच, ते कोणालाही चुकलेले नाही. हे आपल्या सर्वांना ठाऊक असते तरीही 'कळतंय पण वळत नाही' अशी मानसिकता तयार होऊन माणूस इतका का खचतो की त्याचा स्वत:च्या कर्तृत्वावर, स्वत:वर देखील विश्वास राहत नाही.

नकारात्मक परिस्थितीशी लढणे, त्यातून बाहेर पडण्याचा प्रयत्न करणे, सकारात्मक लोकांच्या सहवासात राहणे, त्यांच्या कडून प्रेरणा घेणे, अडीअडचणीवर मात करून पुन्हा उभे राहिलेल्या, शून्यातून विश्व निर्माण केलेल्या लोकांचा सल्ला घेणे आणि आपलं आयुष्य वेळेत सावरणे हे चांगल्या सुशिक्षित, सुसंस्कृत लोकांना देखील का जमू नये? हा प्रश्न आजही अनुत्तरीत राहतो. त्यामुळे आपल्या जवळच्या, विश्वासू लोकांशी मन मोकळे बोला, चर्चा करा, चुका असल्यास मान्य करा, त्यावर सल्ला मसलत करा, मार्ग काढा पण मृत्यू ला कवटाळून आपल्या माघारी जिवंत राहणार्या लोकांना आयुष्यभरासाठी वेदना देऊन जाऊ नका. आपण आत्महत्या केल्यावर देखील लोक आपल्याबद्दल उलट सुलट चर्चा करणारच आहेत, आपल्याला दोष देणारच आहेत, आपल्या घरच्यांना लोकांच्या प्रश्नाची उत्तर द्यायला लावण्यापेक्षाही स्वतः आव्हान स्वीकारून परिस्थिती शी दोन हात करा आणि प्रत्येक चांगल्या वाईट अनुभवातून स्वतःचे आयुष्य घडवा.

**- सौ.मिनाक्षी जगदाळे, नाशिक**

साप्ताहिक माणदेश वार्ता हे साप्ताहिक मालक, प्रकाशक, संपादक सोनवणे रोहित मारूती यांनी मुद्रक माळी अशोक बाळकृष्ण यांच्या बाळकृष्ण ऑफसेट प्रिंटर्स,नेहरू चौक, कोर्टा जवळ, सांगोला, जि. सोलापूर येथे छापून १२७९ अ भारत गल्ली, सांगोला, जि.सोलापूर येथे प्रसिद्ध केले. E-Mail- mandesh_varta@rediffmail.com
संपादक : सोनवणे रोहित मारूती (या अंकातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.) . जुने वर्ष-४३ वे अंक-२८ वा मो. ९४२०६६६५०१, ९०२८५९१४३१

# सर्पदंश लसी साठी ५० लक्ष रुपये तरतुद, आणखी दीड कोटींची मागणी करणार - सभापती चेतनसिंह केदार

## जिल्हा परिषद सोलापूर येथे आरोग्य समिती सभा संपन्न



सोलापूर : सर्पदंश लसी साठी ५० लक्ष रुपये तरतुद, आणखी दीड कोटींची मागणी करणार आरोग्य व शिक्षण समितीचे सभापती चेतनसिंह केदार यांनी दिली.

जिल्हा परिषदेच्या यशवंतराव चव्हाण सभागृहात आज आरोग्य समिती सभा आरोग्य व शिक्षण समितीचे सभापती चेतनसिंह केदार - सावंत यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. या प्रसंगी समितीच्या सदस्या सोनाली कडते, संगिता दुधाळ, शोभा खटकाळे, सविता कोकाटे, सदस्य व्यंकटराव भालके, नागनाथ भोसले जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सतीश कोपूरवाड, अतिरिक्तजिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. नंदकिशोर घाडगे, सांख्यिकी अधिकारी हेमंत पवार उपस्थित होते.

या सभेमध्ये राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रमाचा आढावा घेण्यात आला. सभापती चेतनसिंह केदार सावंत यांनी पारदर्शक पध्दतीने आरोग्य विभागाचा कारभार झाला पाहिजे. तुमच्या अडचणी असतील तर सांगा त्यावर मार्ग काढला जाईल. ग्रामीण भागात पाणी गुणवत्ता चांगली राहणे साठी प्रयत्न करा. वेळेत पाणी नमुने तपासणी झाली पाहिजे. सध्या पाणी टंचाई लक्षात घेता गुणवत्तेकडे लक्ष द्या. तसेच ग्रामीण भागातील जनतेला श्वानदंश लस मिळाली पाहीजे. त्यासाठी जि.प.सेस मधुन ५०.०० लाख तरतुद आहे परंतू या साठी १५०.०० लक्ष (दिड कोटी) तरतुद अपेक्षित आहे. त्याबाबत पाठपुरावा करुन निधी प्राप्त करुन देण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे सांगितले.

आरोग्याच्या दृष्टीने चांगले काम कसे होईल याचा आराखडा तयार करा. अशा सुचना सभापती केदार सावंत यांनी केल्या. प्रत्येक प्रा.आ.केंद्राला भविष्यात सोलर सिस्टिम बसवण्याबाबतचे काय करता येईल याबाबतचे नियोजन करणे बाबत जिल्हा आरोग्य अधिकारी यांना सुचना केल्या.अपंग मुलांचा सर्व्हे करुन अपंग असलेल्या सर्वांना सर्टिफिकेट मिळणेबावत तालुकास्तरावर कॅम्प घेणेबाबत लवकर तालुका आरोग्य अधिकारी यांनी कार्यवाही करावी अशा सुचना दिल्या.

सभापती चेतनसिंह केदार सावंत यांनी आरोग्य समिती सभा अधुन मधुन तालुक्याच्या ठिकाणी घेण्यात यावी अशी सुचना मांडली. गेल्या दोन वर्षापासुन तालुका आरोग्य अधिकारी यांचे वेगवेगळ्या गोष्टीवर खर्च केलेल्या गोष्टींचे बीले पेंडींग आहेत. त्याबाबत समन्वयातून मार्ग काढण्याबाबत व ती बीले त्यांना मिळणेबाबत आवश्यक त्या निधीसाठी पाठपुरावा करणेच्या सुचना दिल्या .

जि.प.सेस च्या २०२६- २७ च्या मुळ ५१०.०८ लक्षच्या मुळ अंदाजपत्रकाच्या विषयास शिफारस मान्यता घेण्यात आली.जिल्हा नियोजन समितीला सादर केलेल्या मंजूर आराखडयास शिफारस करणेसाठी मान्यता घेण्यात आली.

## सह्याद्री फार्मसीमधील इंटिग्रेटेड हेल्थकेयर रेडीनेस प्रोग्रॅम कार्यशाळेला उत्स्फूर्त प्रतिसाद



सांगोला : सह्याद्री फार्मसी महाविद्यालयात बी.फार्मसी अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी इंटिग्रेटेड हेल्थकेयर रेडीनेस प्रोग्रॅम या विषयावरील तीन दिवसाच्या कार्यशाळेचे आयोजन ४ ते ६ मे २०२६ रोजी महाविद्यालयात करण्यात आले होते त्यास विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या प्रशिक्षण कार्यशाळेचे उद्‌घाटन प्रमुख पाहुणे श्री.कमल कुमार डायरेक्टर-एचआर माईंडवर्क, पुणे, संस्था अध्यक्षा अनिता दिलीपकुमार इंगवले, संस्था विश्वस्त विश्वजीत इंगवले, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.मनोजकुमार पाटील यांच्या हस्ते दीपप्रज्वलन व प्रतिमा पूजनाने झाले.

या तीन दिवसीय कार्यशाळेत हेल्थ इन्शुरन्स पोर्टेबिलिटी अँड अकौंटंया बिलिटी ऍक्ट (हिपा) जागरूकता, आरोग्यसेवा दस्तऐवजीकरण, अनुपालन मानके आणि व्यावसायिक कार्यस्थळ सज्जता या विषयावर सरानी विद्यार्थ्यांना मार्मिक मार्गदर्शन केले ज्यामुळे विद्यार्थ्यांना आंतरराष्ट्रीय आरोग्यसेवा आणि आरोग्यसेवासहाय्यक भूमिकांसाठी आवश्यक असलेली कौशल्ये मिळणार आहेत. श्री.कुमार सरानी फार्मा कंपनी नियोक्त्यांच्या अपेक्षा, भरती प्रक्रिया आणि कर्मचारी अनुपालन चौकटींची, विशेषतः हेल्थ इन्शुरन्स पोर्टेबिलिटी अँड अकौंटंयाबिलिटी ऍक्ट (हिपा ) ची गोपनीयता आणि रुग्ण डेटा संरक्षण मानकांशी संबंधित क्षेत्रामधील सखोल व्यावहारिक ज्ञान त्यांनी उदाहरणासहित विशद केले. संरचित आणि उद्योगअनुकूल प्रशिक्षण पद्धतीद्वारे शैक्षणिक शिक्षण आणि व्यावसायिक रोजगाराच्या गरजा यांच्यातील दरी कमी करण्यास हेल्थ इन्शुरन्स पोर्टेबिलिटी अँड अकौंटंयाबिलिटी ऍक्ट (हिपा) कशी मदत करते त्याबद्दल सखोल माहिती दिली. भरती करणाऱ्यांच्या गरजा समजून घेण्याच्या आणि रोजगारक्षमता वाढवण्यासाठी लागणारी कौशल्ये व तंत्रज्ञान यावर माहिती दिली. श्री.कुमार यांनी विद्यार्थ्यांना आरोग्यसेवा संस्था, केपीओ आणि ग्लोबल कॅपॅबिलिटी सेंटर्स मध्ये आत्मविश्वासाने प्रवेश करून यशस्वी होण्याचे तंत्र सांगितले.

या तीन दिवसाच्या प्रशिक्षण कार्यशाळेत विविध उद्योग समूह व कंपन्यांमध्ये नौकरीला सामोरे जाताना येणाऱ्या अडचणी व त्यास कशा रीतीने सामोरे जावे, विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासाबरोबरच, मुलाखत कौशल्य, इंग्रजी भाषेचा प्रभावी वापर, प्लेसमेंट स्किल, गटचर्चा, व्यवसाहिक नीतिशास्त्र, मौलिक कौशल्ये या विषयावर प्रात्यकक्षिकासह सविस्तर मार्गदर्शन केले. सहभागी विद्यार्थ्यांना उपस्थिती प्रमाणपत्राचे वाटप मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.हि कार्यशाळा यशस्वी करण्यासाठी ट्रेनिंग व प्लेसमेंट विभागाचे प्रा.एस.एस.काळे, प्रा.एस.पी. जोकार यांचे योगदान लाभले.

# सांगोला तालुक्यातील वाकी शिवणे येथे तरसांच्या हल्ल्यात १३३ कोंबड्या मृत-जखमी; ६५ हजारांचे नुकसान



सांगोला : सांगोला तालुक्यातील वाकी शिवणे येथील जाधव मळा परिसरात तरस वन्य प्राण्यांच्या टोळक्याने कुक्कुटपालन शेडवर हल्ला करून १३३ कोंबड्या मृत व जखमी केल्याची घटना बुधवारी पहाटे घडली. या घटनेत पशुपालकाचे सुमारे ६५ हजार रुपयांचे आर्थिक नुकसान झाले असून परिसरातील पशुपालकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.

वाकी शिवणे येथील राजू होवाळ यांनी शेतीपूरक व्यवसाय म्हणून शेतातील पत्र्याच्या शेडमध्ये सुमारे ५०० देशी कोंबड्यांच्या ओरडण्याचा आवाज ऐकून शेजारी राहणारे सुधीर साबळे यांनी सकाळी सुमारे ५ वाजता राजू होवाळ यांना फोन करून घटनेची माहिती दिली. त्यानंतर होवाळ कुटुंबीयांनी शेडकडे धाव घेत तरसांना हुसकावून लावले. मात्र तोपर्यंत मोठे नुकसान झाले होते.

घटनेची माहिती मिळताच सरपंच लिंगा आलदर व पोलीस पाटील लहू मेटकरी यांनी घटनास्थळी भेट देऊन नुकसानीची पाहणी केली. पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. हुबाले यांनी जखमी कोंबड्यांवर उपचार केले. तसेच वन विभागाच्या कर्मचाऱ्यांनी कोंबड्यांचे पालन केले आहे.

दरम्यान, कुटुंबातील एका नातेवाइकाचे निधन झाल्याने होवाळ कुटुंबीय अंत्यविधीसाठी बाहेर गेले होते. त्यामुळे शेडवर कोणीही उपस्थित नव्हते. याच संधीचा फायदा घेत बुधवारी पहाटे सुमारे ४ वाजण्याच्या सुमारास एका मोठ्या तरसासह दोन लहान तरसांनी शेडची जाळी फोडून आत प्रवेश केला आणि कोंबड्यांवर अचानक हल्ला चढवला. या हल्ल्यात अनेक कोंबड्या फस्त करण्यात आल्या, तर काही गंभीर जखमी झाल्या. मृत व जखमी कोंबड्यांचा पंचनामा केला.

अचकदाणी, हलदहिवडी, ढाळेवाडी आदी परिसरात वन विभागाचे विस्तीर्ण कार्यक्षेत्र असल्याने तरसांचा मोठ्या प्रमाणात वावर आहे. हे वन्यप्राणी रात्रीच्या वेळी वनक्षेत्रातून बाहेर पडून घराजवळील जनावरे, शेळ्या, मेंढ्या तसेच कुक्कुटपालन शेडवर हल्ले करत असल्याचे ग्रामस्थांनी सांगितले.

दरम्यान, मृत व जखमी कोंबड्यांच्या नुकसानीची भरपाई वन विभागाकडून मिळावी, अशी मागणी पशुपालक राजू होवाळ यांनी केली आहे.

## गारपीट अनुदानासाठी शासनाच्या पोर्टलवर याद्या अपलोड करण्याचे कामकाज सुरु; ६ मंडल मधील तलाठ्यांकडून नुकसानग्रस्त पंचनामाच्या मागवल्या याद्या

सांगोला : महाराष्ट्र शासनाने अवकाळी पाऊस आणि गारपिटीमुळे पिकांचे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांसाठी मदत निधी (अनुदान) मंजुरी बाबत घोषणा केली आहे. २०२५-२६ मधील गारपीट आणि नुकसानीसाठी शेतकऱ्यांना, तसेच इतर बाधित क्षेत्रांना हे अनुदान दिले जाणार आहे. यामध्ये सांगोला तालुक्यातील ६ मंडल मधील शेतकऱ्यांना याचा लाभ मिळणार आहे. त्या अनुषंगाने नुकसानीबाबत माहिती पोर्टलवर अपलोड करण्यासाठी तलाठी यांच्याकडून याद्या मागवण्यात आल्याची माहिती सांगोला महसूल प्रशासनाकडून देण्यात आली आहे.

यामुळे गारपीट अनुदान मिळण्या बाबत शेतकऱ्यांच्या अशा पल्लवीत झाल्या आहेत. सांगोला तालुक्यातील हातीद, कोळे, घेरडी, सांगोला, जवळा, सोनंद असे एकूण सहा मंडल मधील बाधित शेतकऱ्यांना या गारपीट अनुदानाचा लाभ मिळणार आहे. उर्वरित महूद, शिवणे, संगेवाडी, नाझरा या चार मंडल मध्ये गारपीट झाली नसल्याने या मंडल मधील शेतकऱ्यांना अनुदानाचा लाभ मिळणार नसल्याचे महसूल प्रशासनाकडून सांगण्यात आले आहे.

सन २०२५ २६ मध्ये झालेल्या गारपिटीमुळे शेतकऱ्यांच्या शेतीमालाचे फळबागांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले होते. या नुकसानीचे पंचनामे तलाठी यांच्यामार्फत करण्यात आले होते. दरम्यान सदर नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना अनुदान देण्याबाबत शासन स्तरावर निर्णय घेण्यात आला आहे. त्या अनुषंगाने सांगोला महसूल प्रशासनाच्या माध्यमातून थेट शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर अनुदान रक्कम जमा करण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत. यासाठी वरिष्ठांच्या आदेशानुसार शासनाच्या पोर्टलवर नुकसानीचे पंचनामे अपलोड करण्याचे कामकाज सुरू करण्यात आले आहे.

यासाठी सहा मंडल मधील तलाठी यांच्याकडून नुकसान ग्रस्त भागांचे पंचनामे त्याच्या याद्या मागविण्यात आले आहेत. सदर याद्या अपलोड केल्यानंतर थेट शासनाकडून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना अनुदान जमा होणार असल्याचे महसूल प्रशासनाकडून सांगण्यात आले आहे.

# शेतमजूर व ट्रॅक्टर चालकाचा मुलगा बनला पोलीस उपनिरीक्षक महूद येथील विकास मेटकरी पोलीस उपनिरीक्षकपदी निवड



सांगोला : ना शेती, ना राहण्यासाठी घर.अनेक पिढ्या जगण्यासाठी संघर्ष करत होत्या.अशाच एका सर्वसामान्य कष्टकरी,शेतमजूर व ट्रॅक्टर चालक असणाऱ्या महूद येथील नानासो मेटकरी यांचा मुलगा विकास मेटकरी याने जिद्दीने व कष्टाने खाते अंतर्गत घेण्यात आलेल्या परीक्षेतून पोलीस उपनिरीक्षक पदाला गवसणी घातली आहे.

महूद येथील बेघर वसाहत(विठ्ठलवाडी) मध्ये नानासो मेटकरी यांचे कुटुंब राहते. पती-पत्नी,दोन मुले व एक मुलगी असा हा परिवार.कुटुंबात कोणालाही नोकरी नाही.नियमित रोजगार नाही. अशा या कठीण परिस्थितीमध्ये नानासो मेटकरी पडेल ते काम करत.ट्रॅक्टर चालक म्हणून त्यांनी अनेक वर्ष काम केले. त्यांची पत्नी ही शेतमजूर म्हणून काम करत असे. या पती-पत्नीच्या अविरत कष्टावर कुटुंबाचा उदरनिर्वाह सुरू होता. त्यांचा धाकटा मुलगा विकास मेटकरी हा हुशार व होतकरू मुलगा. त्याचे प्राथमिक शिक्षण विठ्ठलवाडी येथील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेत झाले. माध्यमिक शिक्षण गावातील श्री शिवाजी विद्यालयात घेतले.शाळेला असतानाच रिकामा वेळ मिळेल तेव्हा विकासही मिळेल ती मजुरीची कामे करून आई-वडिलांना प्रपंचासाठी हातभार लावत होता.

अत्यंत खडतर व प्रतिकूल परिस्थितीवर जिद्दीने आणि कष्टाने मात करणाऱ्या विकास मेटकरी याचा महूद ग्रामस्थांच्या आणि हनुमान कट्टा अभ्यासिका मित्र मंडळाच्या वतीने नुकताच नागरिक सत्कार करण्यात आला.

यावेळी जिल्हा परिषद सदस्य दादासाहेब लवटे,उमेश पाटील, बापू कदम, जीवन खांडेकर, विलास पाटील, सूर्यकांत घाडगे, विजय खबाले, अभिजीत कांबळे, शंकर पाटील, संतोष खडतरे, संतोष पवार, धनाजी कांबळे, नितीन वडे, विकास पाटील आदी उपस्थित होते. यावेळी मित्रपरिवाराच्यावतीने विकास मेटकरी याची गावातून मिरवणूक काढण्यात आली.

त्यावेळी वैभव बाजारे, प्रभाकर कांबळे, नवनाथ पवार, शहाजी दिघे, गणेश कांबळे, सोमनाथ दुर्वे, राजू जाधव, शशिकांत मेटकरी, इरफान मुलाणी, गणेश बिडवे, विजय पवार, प्रमेय वडे आदी उपस्थित होते.

# न्यू इंग्लिश स्कूल सांगोला चे दहावी बोर्ड परीक्षेत दैदीप्यमान यश

## गणित व मेकॅनिकल टेक्नॉलॉजी विषयात राज्यात प्रथम






सांगोला : एस.एस. सी. परीक्षा फेब्रुवारी/ मार्च २०२६ चा निकाल दुपारी एक वाजता अधिकृत संकेतस्थळावरती जाहीर करण्यात आला. यामध्ये सांगोला शहरातील नामांकित न्यू इंग्लिश स्कूल सांगोला चा एकूण शेकडा निकाल ८५.५६% लागला. गणित व मेकॅनिकल टेक्नॉलॉजी विषयात राज्यात प्रथम क्रमांक पटकावला.

प्रशालेतील एकूण १८७ विद्यार्थी परीक्षेस बसले होते. त्यापैकी १६० विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून न्यू इंग्लिश स्कूल ने दरवर्षीप्रमाणे इयत्ता दहावीच्या निकालाची परंपरा कायम राखत प्रशालेत कुमारी संचिता संजय देशमुख ९८% गुण प्राप्त करून प्रशालेमध्ये प्रथम येण्याचा मान तसेच मेकॅनिकल टेक्नोलॉजी विषयात १०० पैकी १०० गुण मिळवत राज्यात प्रथम क्रमांक मिळवला. द्वितीय क्रमांक विभागून कुमार सोहम सचिन माळी ९६.८०% व कुमारी समृद्धी विष्णू माळी ९६.८०%, तृतीय क्रमांक कुमार गणेश शिवाजी आदलिंगे ९६.२०% तसेच गणित विषयात १०० पैकी १०० गुण मिळवत राज्यात प्रथम क्रमांक मिळवला. चतुर्थ क्रमांक कुमारी सई जगन्नाथ जाधव पाटील ९२.४०% गुण प्राप्त केले आहेत. त्याचबरोबर कुमारी अमराह अब्दुलकरीम पठाण ९२.२०%, कुमारी सुमय्या रहीम मुलाणी ९०.००%, गुण प्राप्त केले आहेत.

९० टक्के पेक्षा अधिक गुण मिळवणारे विद्यार्थी संख्या ७ तर विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण विद्यार्थी संख्या ३७ असून प्रशालेतील विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केलेले आहे.

वरील सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष डॉ.अनिकेत देशमुख, सचिव विठ्ठलराव शिंदे सर, संस्थासंचालक प्रा.डॉ.अशोकराव शिंदे, प्रा.दिपक खटकाळे, प्रा.जयंत जानकर, प्राचार्य प्रा.केशव माने, उपमुख्याध्यापिका वैशाली घोडके, पर्यवेक्षक दशरथ जाधव, तात्यासाहेब इमडे, माणिकराव देशमुख तसेच शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले व त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# सांगोला तालुक्याचा दहावीचा ९२.८३ टक्के निकाल

## ११ शाळांचा १०० टक्के निकाल

सांगोला : महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे घेण्यात आलेल्या दहावीचा निकाल काल शुक्रवार दि.८ मे रोजी दुपारी १ वाजता जाहीर करण्यात आला. ७६ शाळांपैकी तालुक्यातीत फक्त ११ शाळाचां निकाल १०० टक्के लागला आहे. गेल्या वर्षी सांगोला तालुक्याचा दहावीचा निकाल ९५.५७ टक्के लागला होता. यंदा मात्र दहावीच्या निकालामध्ये घट झाली असून तालुक्याचा निकाल ९२.८३ टक्के लागला आहे.

सांगोला तालुक्यातील शाळांचा निकाल पुढीलप्रमाणे- सांगोला विद्यामंदिर सांगोला ९९.३७ टक्के, लिगाडे विद्यालय अकोला (वा) ९३.७५, कै.सौ.वत्सलादेवी विद्यालय जवळे ८६.०८ टक्के, श्री.शिवाजी विद्यालय महुद बु ८२.८७ टक्के, नाझरा विद्यामंदिर ९८.५४ टक्के, बलवडी हायस्कूल ९०.६२ टक्के, विद्यामंदिर हायस्कूल एखतपूर ८९.३९ टक्के, जवाहर विद्यालय घेरडी ९१.५० टक्के, कोळा विद्यामंदिर ९१.४४ टक्के, न्यू इंग्लिश स्कूल लोटेवाडी ९७.६१ %, श्री.छत्रपती शिवाजी हायस्कूल वाटंबरे ९४.५९ टक्के, न्यू इंग्लिश स्कूल सांगोला ८५.५६ टक्के, देशभक्त संभाजीराव शेंडे विद्यालय मेडशिंगी ९६.९६ टक्के, कडलास हायस्कूल कडलास ९२.५९ टक्के, दादासाहेब जगताप विद्यालय उदनवाडी ९७.५६ टक्के, बाळासाहेब देसाई विद्यालय चोपडी ९२.४७ टक्के, मांजरी हायस्कूल मांजरी ९२.४७ टक्के, सोनंद हायस्कूल सोनंद ९५.६५ टक्के, श्रीराम विद्यालय हातीद ८३.५१ टक्के, श्री.अशोकराव देसाई कृषी विद्यालय आलेगाव ९६.९६ टक्के, शिवणे माध्यमिक विद्यालय शिवणे ९२.५२ टक्के, जुनोनी विद्यालय जुनोनी ९३.५७ टक्के, खवासपूर हायस्कूल १०० टक्के, कै.वामनराव शिंदे साहेब आदर्श विद्यालय ६१.५३ टक्के, पांडुरंग विद्यालय कटफळ ९५ टक्के, न्यू इंग्लिश स्कूल पाचेगाव ८४.३१ टक्के, विद्यानिकेतन हायस्कूल गौडवाडी ८६.०४ टक्के, कै.काकासाहेब साळुंखेपाटील विद्यालय हंगिरगे ९२.३० टक्के, खिलारवाडी विद्यालय ९१.८९ टक्के, महात्मा फुले विद्यालय डोंगरगाव ९३.९३ टक्के, महात्मा फुले विद्यालय किडेबिसरी ९२.३० टक्के, डॉ.पी.पाटील हायस्कूल महिम ८०.५५ टक्के, लोणविरे हायस्कूल लोणविरे ९५.४५ टक्के, श्रीधर कन्या प्रशाला नाझरा ९८.२१ टक्के , क्रांतीवीर वि.दा.सावरकर चिणके १०० टक्के, सुशिलकुमार शिंदे विद्यालय चिकमहूद ९१.३० टक्के, मॉडर्न गर्ल्स हायस्कूल महुद बु १०० टक्के, विकास विद्यालय अजनाळे ९४.३१ टक्के, सावित्रीबाई फुले प्रशाला सोनंद ९७.६७ टक्के, बहुउद्देशीय कन्या प्रशाला कडलास ९४.४४ टक्के, हनुमान विद्यालय वासूद ९६ टक्के, भोपसेवाडी विद्यालय ८१.८१ टक्के, श्री.छत्रपती शिवाजी विद्यामंदिर धायटी ९६.६१ टक्के, छत्रपती शिवाजी विद्यालय पारे ९६ टक्के, हलदहिवडी विद्यालय ९८.९३ टक्के, प.पु.उदयसिंहजी देशमुख (भैय्यु महाराज) प्रशाला ९२.३० टक्के, यशवंत हायस्कुल शिरभावी ९६.२२ टक्के, आनंद विद्यालय कमलापुर ८७.५० टक्के, निजामपुर हायस्कूल निजामपुर ९५.२३ टक्के, विद्यामंदिर हायस्कूल वाकी (शिवणे) ९७.५६ टक्के, गुरूदत्त विद्यालय वाकी (घेरडी) ८५ टक्के, मानेगाव विद्यालय मानेगाव ९६.४२ टक्के, माध्यमिक विद्यालय लक्ष्मीनगर ९८.२४ टक्के, चिंचोली माध्यमिक विद्यालय चिंचोली ९५.१६ टक्के, अचकदाणी माध्यमिक विद्यालय १०० टक्के, सावे माध्यमिक विद्यालय सावे ९७.७२ टक्के, ज्ञानदीप विद्यालय सांगोला ९४.११ टक्के, लक्ष्मी माध्यमिक विद्यालय राजुरी ८९.७४ टक्के, बलवडी कन्या प्रशाला १०० टक्के, कै.दत्तात्रय चौगुले विद्यालय य.मंगेवाडी ७३.३३ टक्के, कै.अभिजीत कदम विद्यालय मेथवडे ८०.५५ टक्के, इटकी विद्यालय ७३.३३ टक्के, मॉडर्न विद्यालय घेरडी ८४.३१ टक्के, प्रगती विद्यालय वाणीचिंचाळे ९३.७५ टक्के, आदर्श विद्यामंदिर जुजारपूर ८९.२३ टक्के, नराळे विद्यालय ९३.७५ टक्के, माध्यमिक शाळा डिकसळ ८६.८८ टक्के, शिवाजी प्रशाला बागलवाडी ८६.९५ टक्के, सह्याद्री इंग्लिश मिडीयम स्कुल सांगोला १०० टक्के, श्री गुरूकुल विद्यापीठ, राजुरी १०० टक्के, फिनिक्स इंग्लिश स्कूल,महुद बु. १०० टक्के, फिनीक्स प्री.से.मराठी स्कूल ९३.२२ टक्के, पायोनिअर सेमी इंग्लिश स्कूल मंगेवाडी १०० टक्के, सांगोला विद्यामंदिर इंग्लिश मिडीयम १०० टक्के, उत्कर्ष माध्यमिक विद्यालय सांगोला ९९.०४ टक्के, लक्ष्मीदेवी विद्यामंदिर १०० टक्के.

**१०० टक्के निकाल लागलेल्या सांगोला तालुक्यातील ११ शाळा :** खवासपूर हायस्कूल १०० टक्के, क्रांतीवीर वि.दा.सावरकर चिणके १०० टक्के, मॉडर्न गर्ल्स हायस्कूल महुद बु १०० टक्के, अचकदाणी माध्यमिक विद्यालय १०० टक्के, बलवडी कन्या प्रशाला १०० टक्के, सह्याद्री इंग्लिश मिडीयम स्कुल सांगोला १०० टक्के, श्री गुरूकुल विद्यापीठ राजुरी १०० टक्के, फिनिक्स इंग्लिश स्कूल, महुद बु.१०० टक्के, पायोनिअर सेमी इंग्लिश स्कूल मंगेवाडी १०० टक्के, सांगोला विद्यामंदिर इंग्लिश मिडीयम १०० टक्के, लक्ष्मीदेवी विद्यामंदिर १०० टक्के

# कमलापूरजवळ भीषण अपघात

## एसटी चालकासह ७ प्रवासी जखमी

सांगोला : राष्ट्रीय महामार्ग क्रमांक १६६ वर कमलापूर गावाजवळील पुलावर शनिवारी (दि. २ मे) दुपारी साडेतीनच्या सुमारास झालेल्या भीषण अपघातात एसटी बस चालकासह सात प्रवासी जखमी झाल्याची घटना घडली. भरधाव वेगात व निष्काळजीपणे चालवलेल्या एसटी बसने पाठीमागून पाणी टँकरला जोरदार धडक दिल्याने हा अपघात झाला. याबाबत सांगोला पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून सिध्देश्वर भोसले (रा. वाढेगाव) यांनी फिर्याद दिली आहे. त्यानुसार एसटी बसचालक जगदीश पाटील (नेमणूक - मालवण आगार) याच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मालवण आगाराची एसटी बस सांगली-सोलापूर मार्गावरून प्रवास करत होती. सांगोला तालुक्यातील कमलापूर गावाजवळील पुलावर पाण्याच्या टँकरला बस चालकाने निष्काळजीपणे व भरधाव वेगात येत जोरदार धडक दिली. या धडकेची तीव्रता इतकी मोठी होती की बसच्या पुढील भागाचे मोठे नुकसान झाले, तर टँकरचेही नुकसान झाले. या अपघातात बस चालक जगदीश पाटील स्वतः गंभीर जखमी झाला असून बसमधील प्रवासी सुहाना शेख (रा. सांगली), लहु मोहीते (रा. तिप्पेहाळ्ळी), नजर पठाण (रा. सलगरे), प्रकाश कदम व मिलींद कदम (रा. निपाणी) तसेच गुलशान शेख (रा. सांगली) हे जखमी झाले आहेत. हा अपघात इतका भीषण होता की दोन्ही वाहनांचे अंदाजे १० लाख रुपयांचे आर्थिक नुकसान झाल्याचे समोर आले आहे. दरम्यान, जखमींना तातडीने उपचारासाठी जवळील रुग्णालयात हलविण्यात आले. या प्रकरणी पुढील तपास पोहेकॉ बोराटे करीत आहेत.

निर्भिड व सडेतोड बातम्यांसाठी
नियमित वाचा....
साप्ताहिक माणदेश वार्ता